# वाईल्ड कॅम्पसोबत निसर्गातली अनोखी धमाल





डॉ. जितेंद्र खेर

जर आपल्याला कुणी विचारले की तुमच्या आयुष्यातील सर्वात सुखाचा किंवा आनंदी क्षण कोणता? विचारुन बघा स्वत:लाच हा प्रश्न? काय उत्तर मिळतंय? आश्चर्याची गोष्ट आहे. एवढ्या वस्तू, सामान, महागडे दागिने, कपडे, मोठे घर घेतलत तुम्ही, पण हे सगळे क्षण तुमच्या मनात देखील आले नाहीत. पण त्या उलट कदाचित हे सर्व घेताना जी माणसं होती तुमच्याबरोबर, ज्या गप्पा तुम्ही मारल्यात किंवा एखादी सहल जिथे तुम्ही सगळ्यांनी केलेली मनमुराद धमाल, एखादा समारंभ जिथे तुम्ही तुमच्या जिव्हाळ्याच्या माणसांबरोबर केलेली गम्मत हे क्षण आधी तुमच्या मनात येतात. खरंच म्हणतात पैशात सुख नाही सुख आहे आपल्या माणसात. ही माणसं काही रक्ताची नातीच नव्हे



तर तुमचे मित्र-मैत्रिण, नातेवाईक, सोसायटीतले शेजारी तुमचे सहकर्मचारी हेही असतात. एकत्र आल्यावर एकटेपणा चुटकीत पळून जातो आणि हा एकत्रपणा हीच आपण भारतीयांची खरी संस्कृती, जी कदाचित हल्लीच्या धावपळीत आपण विसरत चाललो आहोत. आपण कधी-कधी खूपच आत्मकेंद्रीत होतो. जे आपण नाही ते दर्शवू लागलो आहोत आणि म्हणूनच येतो तो एकटेपणा आणि नैराश्य. एकमेकांना भेटणे म्हणजे फक्त स्वतबद्दल बोलणे हेच होत चालले आहे आणि म्हणूनच हा स्ट्रेस शब्द सतत हल्ली आढळतो. मुक्तपणे मजा आपण करतच नाही आहोत. सतत सेल्फी घेण्यामागे व मग कमेंट्स मिळवण्यामगे कसं मिळेल आपल्याला खरं सुख? म्हणूनच एक सुखद अनुभव घेण्याकरिता प्लॅन करा. एक अनोखा पावसाळी गेट टुगेदर तुमच्या आवडत्या ग्रुपबरोबर ज्यांच्याबरोबर तुम्हाला काही दाखवण्याची, काही सांगण्याची की सेल्फीची ही गरज नाही. करा मनमुराद धमाल आणि बदल्यात वाढवा आपला मित्र परिवार व थोडक्यात आपले आयुष्य. हे जबरदस्त विचार आहेत तेजस्वी व तडफदार, अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित माऊंटन रेंजचे संचालक डॉ. जितेंद्र खेर यांचे आणि हे सगळं अनुभवायला त्यांचंच एक तितकंच जबरदस्त डेस्टीनेशन ही तयार आहे. मुंबईपासून अगदी दोन तासांच्या अंतरावर असलेले वाईल्ड कॅम्प-द नेचर रिसॉर्ट. तुम्हाला आणि तुमच्या ग्रुपला इथे अनोखी धमाल येईल यात शंकाच नाही. इथे आलेल्या अनेक देशी-विदेशी पर्यटकांच्या खास आग्रहावर वाईल्ड कॅम्पमध्ये आधीच्या कॉटेजेस सोबत नवीन नऊ लक्झरिअस कॉटेजेसची वाढही केली आहे. रिसॉर्टची नवीन रचना अतिशय मनमोहक आहे आणि हे आपल्याला आत प्रवेश केल्यावरच समजते. जिथे नजर जाते तिथे विलोभनीय निसर्ग आणि आता तर निसर्गाचे हे सुरेख रुप अगदी ओसंडून वाहत आहे. जव्हार फाट्याच्या आत शिरताच ठिकठिकाणी छोटे-छोटे झरे, विलोभनीय धबधबे दृष्टीस येतात. आहा! डोळ्याचं पारणं फिटणं यालाच काय ते म्हणत असतील. तुम्हाला जणू भारतातल्या स्विझर्लंडला आल्याची जाणीव होईल. रिसॉर्टच्या जवळपासही अनेक छोटे-मोठे धबधबे आहेत. शिवाय रिसॉर्टमध्येही तुमच्या करमणुकीसाठी दोन स्विमिंग पूल्स, रेन डान्स, ओपन एअर जीम, इन्डोर गेम्स रुम, किड्स प्ले एरिओ हे सर्व पर्याय आहेत. इथल्या ओपन एअर रेस्टॉरंट अँड बारमध्ये बसून निसर्गाचा सुंदर नजारा बघत तुम्ही चविष्ट व लज्जतदार व्हेज-नॉन व्हेज जेवणाचा आस्वाद लुटू शकता. असे हे निसर्गाने नटलेले वाईल्ड कॅम्प तुम्हाला व तुमच्या ग्रुपला आनंद दिल्यावाचून राहणार नाही. मग वाट कसली बघताय, गरज आहे फक्त तुमच्या जिव्हाळ्याच्या ग्रुप बरोबर एक तारीख ठरवायची आणि वाईल्ड कॅम्पला एक फोन करायची. ग्रुप बरोबर, आपल्या माणसांबरोबर केलेली ही निसर्गातली धमाल नक्कीच तुमच्या आयुष्यातील एक सुखद क्षण म्हणून आठवणीत राहील.

**अधिक माहितीसाठी संपर्क- 022-25306263/ 022-25451234/9224586060/9920994229**

**www.wildcamp.in**